जा.क्र. 2972
दिनांक :- 07/03/2021

# प्रेसनोट

## कोविड-१९ लसीकरण तिसरा टप्पा बाबत आवाहन

कोरोना प्रादुर्भाव लढाईत महत्वाचा तिसरा लसीकरणाचा टप्पा उद्या पासून सुरु होत आहे. या लसीकरण सत्रात वय वर्ष ६० वरील सर्व वयोवृद्ध नागरिकांचे कोविड-१९ लसीकरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ४५ ते ६० या वयोगटातील सर्व नागरिक ज्यांना काही असंसर्गजन्य आजार (उच्च रक्तदाब, कॅन्सर, मधुमेह,किडनीचे आजार इत्यादी) आहेत यांना देखील कोविड-१९ लसीकरण करण्यात येणार आहे.

यासाठी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील लसीकरण सेंटर येथे मोफत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या खाजगी रुग्णालयात येथे लसीकरण करण्यात येणार आहेत. उद्या पासून सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी कोविड लसीकरण सुरू होणार असून आपल्या जवळच्या कोविड लसीकरण केंद्रावर लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

लसीकरणासाठी कोविन ॲप मध्ये नोंदणी करण्यात येणार असून ज्या नागरिकांची नोंदणी अद्याप झाली नाही त्यांचे स्पॉट नोंदणी करण्यात येणार आहे.त्यामुळे सर्व जनतेने लसीकरण करून घ्यावे यातून कुठल्याही प्रकारचे मोठ्या स्वरूपाचे साईड इफेक्ट होत नाहीत.

डॉ.विपीन इटनकर
(जिल्हाधिकारी ,नांदेड )